# नर्सिंग संस्थांना मान्यतेचा अधिकार 'परिचर्या'ला नाही

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

नवी दिल्ली : देशातील नर्सिंग अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना मान्यता देण्याचा अधिकार भारतीय परिचर्या परिषदेला नसल्याचा कर्नाटक उच्च न्यायालयाच्या एक सदस्यीय खंडपीठाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयानेही कायम केला.

कर्नाटक राज्य खाजगी नर्सिंग संस्था संघटनेने कर्नाटक उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल केली होती. सुनावणीअंती एक सदस्यीय खंडपीठाने वरीलप्रमाणे आदेश दिला होता. त्याचप्रमाणे भारतीय परिचर्या परिषदेने नर्सिंग अभ्यासक्रमाच्या परवानगीसंदर्भातील कोणतेही साहित्य तथा मान्यताप्राप्त संस्थांची यादी अशी संपूर्ण माहिती अधिकृत संकेतस्थळावरून त्वरित काढून घेण्याचेही २४ जुलै २०१७ रोजी आदेशित केले होते.

या आदेशाला कर्नाटक उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने अंशत: स्थगिती दिली होती. त्याविरुद्ध उपरोक्त नर्सिंग संघटनेने सर्वोच्च न्यायालयात 'दिवाणी अर्ज' दाखल करून आव्हान दिले होते. त्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने ११ सप्टेंबर २०१७ रोजी कर्नाटक उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाचा आदेश रद्द करीत एक सदस्यीय खंडपीठाचा २४ जुलै २०१७ रोजीचा आदेश कायम केला.

" वरील आदेशाच्या अनुषंगाने भारतीय परिचर्या परिषदेचे महाराष्ट्र नियुक्त सदस्य तथा महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलचे अध्यक्ष डॉ. रामलिंग माळी यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, भारतीय परिचर्या परिषदेने आजपर्यंत भारतीय परिचर्या परिषद कायदा १९४७ मधील तरतुदींचा गैरउपयोग घेऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील आदेशामुळे नर्सिंग अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना मान्यतेची कोणतीही अडचण राहत नाही.

" भारतीय परिचर्या परिषदेने कर्नाटक राज्यात ७०० महाविद्यालयांना परवानगी दिली. तसेच बहुतेक महाविद्यालयाला १०० विद्यार्थ्यांना प्रवेशाची परवानगी दिली. याउलट महाराष्ट्रातील महाविद्यालयांवर अन्याय करून प्रत्येक महाविद्यालयास २० ते ४० विद्यार्थ्यांना प्रवेशाची परवानगी दिली असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य खासगी नर्सिंग स्कूल, कॉलेज मॅनेजमेंट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार यांनी केला आहे.